बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१४९ ■ शनिवार ८ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
—श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्—
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

राज्यात प्रथमच महिलांच्या विषयांसाठी ग्रामसभा महिला आयोगाचा पुढाकार, महत्वाचे ठराव होणार

मुंबई, दि.७- जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत उद्या दिनांक ८ मार्च २०२५ रोजी राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या संपल्पनेनुसार बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे तसेच महिला सुरक्षिततेसाठीचे ठराव या ग्रामसभांमध्ये करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या मागणीनुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ८ मार्च रोजी, जागतिक महिला दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश ६ मार्च २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत. याबाबत बोलताना महिला आयोगाच्या रुपाली चाकणकर म्हणाल्या की, पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, विधवा महिलांना रुढी व अंधश्रद्धेमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागते आहे. या सोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक स्तरावर जनजागृती व्हावी यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून गावात बालविवाह होउ न देणे, पतीच्या निधनानंतर महिलांना जाचक असणार्या प्रथा बंद करणे, गावात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयतक करणे आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे असे ठराव करण्यात यावे अशी आयोगाची संकल्पना आहे. संपुर्ण गावात असे ठराव शासकीय पातळीवर झाल्यास जनसामान्यांच्या मनात महिलांना सन्मानाने वागवणे ही कर्तव्य भावना रुजवता येईल. महिलांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्याकडे पाहाण्याचा दृष्टीकोनही अशा प्रयतकांतून बदलेल म्हणून आयोगाने ही संकल्पना मांडल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष ग्रामसभा आयोजित करण्यास निर्देश दिल्याबद्दल त्यांनी राज्याचे (पान ४ वर)

हरियाणात वायूसेनेचे फायटर जेट जग्वार क्रॅश

पंचकुला, दि.७- हरियाणाच्या पंचकुला येथे मोरनीजवळ बालदवाला गावांत अचानक एक फायटर जेट कोसळल्याने खळबळ उडाली आहे. या दुर्घटनेने गावकऱ्यांमध्ये घबराट पसरली. या दुर्घटनाग्रस्त जग्वार जेट विमानाचा पायलट पॅराशुटच्या मदतीने खाली उतरण्यात यशस्वी ठरल्याचे गावकऱ्यांनी म्हटले आहे. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी पोहचले आहेत. या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश भारतीय वायू दलाने दिले आहेत. घटना स्थळी विशेष तज्ज्ञांची टीम देखील रवाना झाली आहे. हा अपघात इतका भयानक होता की याचा अंदाज यावरुन येतो की अपघातानंतर या विमानाचे तुकडे दूरपर्यंत विखुरले गेले आहेत. जग्वार फायटर जेट (पान ४ वर)

महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाला रमाई महिला मंचचा पाठिंबा; तहसीलदारांना निवेदन

शहादा, दि.७ (का.प्र.)- बुद्धगया बिहार येथील महाबोधी महाविहार मंदिर १९४९ चा कायदा रद्द करुन जागतिक किर्तीचे ऐतिहासिक महाबोधि महाविहार बौद्ध धम्मगुरु यांच्या ताब्यात देण्यात यावे याबाबत रमाई महिला मंच, विविध सामजिक, राजकीय संघटना व बुद्धिस्ट संघटनेतील पदाधिकारी यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहादा येथील सामाजिक ,राजकिय, बुद्धिस्ट संघटनेचे सर्व महिला पदाधिकारी यांच्या वतीने सामूहिक निवेदन देत आहोत. गेल्या दि.१२ फेब्रुवारी २०२५ माघ पोर्णिमेपासून बिहार बोधगया येथे महाबोधी महाविहाराच्या ताबा बौद्धधम्मगुरुंना मिळावा यासाठी राष्ट्रीय स्तरावर भिक्खुसंघाच्या माध्यमातून मोठे आंदोलन सुरु आहे. महाबोधी महाविहार ब्राम्हण सदस्यांच्या ताब्यात असून त्यांच्या ताब्यातुन काढून ते बौद्ध धम्मगुरुच्या स्वाधीन करावे. त्याचप्रमाणे महाबोधी महाविहार ताबा बौद्धांना न मिळण्याचे सर्वात मोठे कारण (पान ४ वर)

दुचाकी लंपास करणारा आरोपी जेरबंद; मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, अनेक गुन्हे उघडकीस

धुळे, दि.७-शहरातून विविध भागातून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. वाहनधारकांकडून दुचाकी चोरीला गेल्यासंदर्भात फिर्याद पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आलेल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेकडून गुन्ह्याचा समांतर शोध सुरू असतांना एका संशयिताला ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने त्याच्या जवळील तब्बल आठ दुचाकी काढून दिल्या. आरोपीवर याआधीही एक दोन नव्हे तर दहा वेळा वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला

गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीकडून एकुण सव्वा दोन लाख रूपये किंमतीच्या दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

चाळीसगाव रोड पवन नगर येथील रहिवासी जवाहरलाल रामआसरे यादव यांची मालेगाव रोडवरील खान्देश गोशाळा येथे रामभद्राचार्य महाराजांच्या प्रवचन कार्यक्रमाच्या भोजन व्यवस्थेजवळून दुचाकी क्र.एम एच १८/बीपी-९८०८ अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. या प्रकरणी फिर्याद (पान ४ वर)

मनपा स्थायीने एक हजार एकशे सात कोटीचा नऊ लाख शिलकीचा सादर केला अर्थसंकल्प

धुळे, दि.७- महापालिकेच्या महासभेत स्थायी समितीने सन २०२४-२५ चे सुधारीत व सन २०२५-२६ चे सुधारीत एक हजार एकशे सात कोटींचे कोणतीही करवाढ न करता नऊ लाख शिलकीचे अर्थसंकल्प सादर केला. जागतिक महिला दिनाच्या पुर्वसंध्येला आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी प्रशासक पदावरून दुसऱ्यांदा अर्थसंकल्प सादर करत असल्याचे समाधान वाटत आहे. अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. या अर्थसंकल्पात म हापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणायात आले असून मनपाच्या फंडावर बोझा न टाकता राज्य व केंद्र शासनाच्या योजनांमधून पैसा

उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

स्व.दिलीप पायगुडे समिती सभागृहात घेण्यात आलेल्या महासभेप्रसंगी आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांच्यासमवेत अति.आयुक्त करूणा डहाळे, उपायुक्त शोभा बाविस्कर, बाळासाहेब तट्टु, सहा. उपायुक्त किशोर सुडके, नगरसचिव मनोज वाघ यांच्यासह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी अर्थसंकल्पाविषयी बोलतांना दगडे-पाटील म्हणाल्या की, या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ केलेली नाही. उलट मालमत्ता करापोटी आकारली जाणारा ३६ टक्के कराची कपात करून ३० टक्के करण्यात आला असून दि.१ एप्रिल २०२५ पासून थकबाकीदारांना बिल वाटप करणे सुरू करण्यात येईल. महापालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी शॉपिंग कॉम्प्लेक्सची उभारणी करून उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण केला जाईल. मागच्या अर्थसंकल्पापेक्षा यावेळी चाळीस कोटींच्या तरतुदी कमी करण्यात आल्याने एक प्रकाने मनपाची ती बचतच आहे. शहरातील वलवाडी सर्व्हे.नं.१७६ येथे भाजी मंडई उभारणी, शहरातील तीन हजार तीनशे दिव्यांगाचा सर्व्हे करण्यात आला असून त्यांना दर वर्षी चार हजार मिळणाऱ्या निधीत वाढ करून तो आता पाच हजारांची वाढीव तरतुद करण्यात आली आहे. शहरात दिव्यांग उभारणीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला आहे. महापालिकेतील जुनी महत्वाची कागदपत्रांपैकी सत्तावीस लाख कागदपत्रांचे स्कॅनिंग पुर्ण करण्यात आले असून त्यांची (पान ४ वर)

नंदुरबार जि.प.चे चाळीस कोटी अठ्ठेचाळीस लाखांचे अंदाजपत्रक

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्हा परिषदेच्या बैठकीत सन २०२५-२६ च्या ४० कोटी ४८ लाख रुपयांच्या मुळ अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली आहे. या अंदाजपत्रकामध्ये आरोग्य, शिक्षण, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या योजनांवर भर देण्यात आला आहे.

नंदुरबार जिल्हा परिषदेची बैठक प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सावनकुमार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद्कुमार पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण देवरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश घोलप, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पांडूरंग कोल्हे व जिल्हा परिषदेचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत नंदुरबार जिल्हा परिषदेच्या स्व-उत्पन्नाचे सन २०२४-२५ च्या ३८ कोटी ४७ लाख रकमेच्या (पान ४ वर)

मधमाशांचा हल्ला शेतकऱ्याचा मृत्यू

धुळे, दि.७- साक्री तालुक्यातील रायपूर पोस्ट भामेर येथील चोपन्न वर्षी शेतकरी घराकडे येते असतांना अचानक मधमाशांनी हल्ला केल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, नारायण तुळशीराम थोरात (वय ५४) हे त्यांच्या शेतातुन घरी येत असतांना रायपुर बारीच्या कळंभीर शिवारात रस्त्याच्या खाली मधम ाधांनी नारायण थोरात यांच्यावर हल्ला केला. गंभीर जखमी अवस्थेत उत्तम ढेमा कोरडकर यांच्या शेतात पडलेले आढळून आले. त्यांना उपचारासाठी परिसरतील नागरिकांच्या मदतीने साक्री ग्रामीण रूग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले.

बेटावद अपहार प्रकरणी सरपंच, ग्रामसेवकाचा जामीन अर्ज फेटाळला

धुळे, दि.७- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद येथे विकास कामे करत असतांना ग्रामसेवक व तत्कालिन सरपंच महिला यांनी संगनमताने बारा लाख एकोणपन्नास हजार दोनशे शहाण्णव रूपयांचा अपहार केला. याप्रकरणी नरडाणा पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला. मा.न्यायालयात या प्रकरणी सुनावणी होवून न्यायमुर्ती डी.एम.आहेर यांनी दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला. सरकार पक्षातर्फे मा.न्यायालयात जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह योगेंद्रसिंह तवर यांनी प्रखर युक्तीवाद केला.

बेटावदचे ग्रामसेवक आरोपी संतोष मानसिंग राठोड व तत्कालिन महिला सरपंच सुशिलाबाई आत्माराम कोळी यांनी संगनमताने बारा लाख एकोणपन्नास हजार दोनशे शहाण्णव रूपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्याने विस्तार अधिकारी महेशकुमार धडु सोनवणे यांनी नरडाणा पोलीसांत फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील आरोपींनी अटकपुर्व जामीन अर्ज मा.न्यायालयात दाखल केले होते. जामीन अर्जाच्या सुनावणीच्यावेळी जिल्हा सरकार वकील देवेंद्रसिंग (पान ४ वर)

सेवा सुपर स्पेशालिटीत मुत्ररोग संबंधित शिबीर

धुळे, दि.७- साक्री रोड मिशन कंपाऊंड येथील सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर येथे उद्या दि.९ मार्च रोजी सकाळी अकरा ते दुपारी तीन वाजेच्या कालावधीत सुप्रसिध्द युरॉलॉजिस्ट डॉ.आशिष छाजेड रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.मुत्ररोग संबंधित आजार, मुत्रपिंड, मुत्रमार्ग, मुत्राशय या संदर्भात लक्षणे दिसुन येणाऱ्या रूग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा. डॉ.आशिष छाजेड तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत.

सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालय येथे विभागीय लोकशाही दिन

नाशिक, दि.७- येथील विभागीय आयुक्त कार्यालयात सोमवार, दिनांक १० मार्च, २०२५ रोजी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विभागीय महसूल उपायुक्त जितेंद्र वाघ यांनी दिली आहे.

नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालय येथे सकाळी ११ वाजता होणाऱ्या विभागीय लोकशाही दिन कार्यक्रम विभागातील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात दाखल झालेली प्रकरणांबाबत तक्रारदार समाधानी नसतील तर तेच या लोकशाही दिनामध्ये अर्ज दाखल करु शकतात. दरम्यान, याच वेळेस विभागीय महिला लोकशाही (पान ४ वर)

नंदुरबारमध्ये उद्या महिला दिनानिमित्त नारी-शक्ती निर्धार महिला महोत्सव

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- नारी-शक्ती निर्धार महिला मेळाव्यानिमित्त लायन्स क्लब फेमिनातर्फे ९ मार्च रविवार रोजी भव्य नारी-शक्ती क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या दहा वर्षापासून नारी-शक्ती निर्धार महिला मेळाव्याच्या संयोजक ला.डॉ. तेजल चौधरी व लायन्स फेमिना क्लब व नंदुरबारच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणार्या सर्व महिला मंडळाच्या सहयोगाने नारी-शक्ती निर्धार महिला मेळाव्याचे आयोजन होत असते.

यंदा या मेळाव्याच्या माध्यमातून रविवारी नारी-शक्ती क्रीडा महोत्सव समितीतर्फे येथील एस.ए.मिशन हायस्कुल येथे सकाळी ८ वाजे पासून भव्य नारी-शक्ती क्रीडा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नंदुरबार येथील क्रीडा शिक्षकांचे सहकार्य लाभणार आहे. सहभागी तरुणी-महिला स्पर्धकांना विविध पारितोषीकांसह सर्व तरुणी व महिलांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच आज शनिवार दि.८मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान तरुण-तरुणींसह महिलांसाठी येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरात (पान ४ वर)

स्वच्छ भारताची संकल्पना घेवून महाराष्ट्र भ्रमंती सोनगीरच्या यशवंत कान्हेरेंचे ग्रामस्थांकडून स्वागत

सोनगीर दि.७ (प्रतिनिधी)- स्वच्छ भारत, हरित भारत, समर्थ भारत ही संकल्पना घेऊन येथील मूळ रहिवासी यशवंत कन्हेरे हे महाराष्ट्रभर जनजागृतीसाठी दुचाकी वाहनाने फिरत आहेत. सोनगीर या मूळ गावी त्यांचे गावकऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

येथील मूळ रहिवासी यशवंत गंगाधर कन्हेरे (वय ६९) हे सध्या पुणे येथील पिंपरी चिंचवड शहरात राहतात. ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शहर स्वच्छता अभियान ब्रँड म्बेसिडर म्हणून कार्यरत आहेत. संत गाडगेबाबांच्या विचारांनी प्रेरित होऊन गावोगावी फिरून गावकऱ्यांना युवकांना विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी, प्लास्टिक वापराबाबत जनजागृती आदी विषयांवर ते गावागावात जाऊन प्रबोधन करत आहेत. पुणे येथील बजाज कंपनीतून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी संत गाडगे (पान ४ वर)

हस्ती बँकेने अपघातात मयत खातेदारांच्या वारसाना प्रधानमंत्री विम्यातून दिला चार लाखांचा लाभ

दोंडाईचा, दि.७- उत्तर महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त व सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या दि हस्ती को-ऑप. दोंडाईचा येथील खातेदार कै. किशोर देविदास वाडीले यांचे अपघाती निधन झाले होते. मयत खातेदार किशोर वाडीले यांच्या वारसांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व प्रधानमंत्री जीवन ज्योति विमा योजना या दोन्ही योजनेचे चार लाख रुपयांचा लाभ हस्ती बँकेचे अध्यक्ष कैलास जैन यांच्या हस्ते नुकताच देण्यात आला.

यावेळी हस्ती बँक प्रेसिडेंट कैलास जैन, दोंडाईचा शाखा समिती चेअरमन किशोर जैन, पहलाज माखिजा, प्रकाश कुचेरीया, मधुबाला जैन,शाखा व्यवस्थापक अनिल मराठे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रत्येक खातेदारांनी आपल्या कुटूंबाच्या भविष्यासाठी प्रधानमंत्री विमा आवर्जून काढावा व आपल्या कुटुंबियांचे भविष्य सुरक्षित करावे असे आवाहन बँकेचे अध्यक्ष कैलास जैन यांनी केले. सदर विमा मंजुरीसाठी बँकेचे सीईओ सतीश जैन, आय टी विभाग प्रमुख सुनील गर्गे, शाखाव्यवस्थापक अनिल मराठे प्रविण रायपूरे यांनी पाठपुरावा केला. बँकेचे अध्यक्ष कैलास कांतीलाल जैन, मुख्य कार्यकारी अधीकारी सतीष केसरीमलजी जैन यांच्या मार्गदर्शनाने मयत किशोर वाडीले यांच्या वारसांना प्रधानत्री विम्याचा लाभ मिळवुन देण्या साठी सातत्याने पाठपुरावा करुन विम्याचा लाभ मिळवुन दिला.

हस्ती बँकेचे मुख्य आधारस्तंभ व प्रेरणास्रोत स्व.काकाजी कांतीलालजी जैन यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून बँकेने आतापर्यंत विम्या योजनेतून लाख रुपयांची रक्कम अपघाती मृत्यू पावलेल्या खातेदारांच्या वारसांना लाभ मिळून दिला आहे.

ट्रॉलावर दुचाकीची धडक; एकाचा मृत्यू

धुळे, दि.७- शहरालगतच्या हॉटेल झंकार समोर रस्त्याच्या मधोमध उभा केलेल्या ट्रॉलावर दुचाकीस्वाराने मागुन धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वाराचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला आहे.प्रम ेद शांतीलाल पवार यांनी दि.६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळे तालुक्यातील अवधान गावातील स्वप्नील संजय डहाळे (वय २५) हा तरूण दुचाकी क्र.एमएच १८/एटी-६१४३ घेवून दि.५ मार्च रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास खाजगी काम आटोपून अवधान येथे येत असतांना गुरूद्वाराजवळील ब्रिजवरील चाळीसगाव चौफुलीकडून (पान ४ वर)

०८ रोजा ०९	
८ मार्च २४	९ मार्च २४
इफ्तार	सहेरी
६.४०	५.२६

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -79,500 रु.+3% GST
सोने- 24 K -86,800 रु.+3% GST
चांदी- 99,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

सेवा सुपर स्पेशालिटी न्युरोट्रॉमा व क्रिटीकल केअर सेंटर
PATIENT SAFETY & QUALITY OF CARE NABH PRE ACCREDITED
सुप्रसिद्ध यूरोलॉजिस्ट तज्ञ यांच्याकडून
मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबीर
आपणास कळविण्यात आनंद होतो कि सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर धुळे यांच्या तर्फे मूत्र रोग संबधित तपासणी व मार्गदर्शन शिबीर करण्यात आले आहे.
खालील लक्षणे आढळून आल्यास आवर्जून शिबिरात यावे.
मूत्र रोग संबंधित आजार | मूत्र पिंड | मूत्र मार्ग
मूत्राशय या सदर्भातील आजार
डॉ. आशिष छाजेड
UROLOGIST MS, MCH

सोनोग्राफी अल्प दरात
वार. रविवार दि. - ०९/०३/२०२५ वेळ - ११ ते ३ पर्यंत.
ठिकाण - सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे 02562 - 246333, 247555

आपला महाराष्ट्र

स्वसंरक्षणार्थ महिला सक्षम होवोत

आज जागतिक महिला दिन आहे.त्या निमित्ताने तमाम भगिनींना हार्दिक शुभेच्छा. पुढील काळात स्वसंरक्षणासाठी त्या सक्षम होवोत आणि सज्ज होवोत अशा सदिच्छा आम्ही व्यक्त करीत आहोत.पुढचा काळ त्यांचे संरक्षण त्यांनीच करावे असा आहे. दिवसेंदिवस त्यांचा लचका तोडणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर जन्माला येत आहे.दुर्जन वाढत आहेत. सज्जनही मोठ्या प्रमाणावर समाजात आहेत पण ते झोपलेले असतात. अन्याया विरूद्ध पेटून उठत नाहीत. परिणामी दुर्जनांचे फावले आहे. महिलांचा संरक्षक कोणी राहिलेला नाही. म्हणून त्यांचे संरक्षण त्यांनीच करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे असा हा काळ आहे. भारतात भगवतीची उपमा त्यांना देण्यात आलेली आहे. भगवतीची पूजा होते.पण महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन स्वच्छ नाही.अजुनही अठराव्या शतकातच त्यांनी वावरावे अशी धर्मांधांची ईच्छा आहे. असे वातावरण देशात असताना महिला दिन साजरा होत आहे.त्या पार्श्वभूमीवर महिलांनीच आता विवेकवादी असण्याची गरज निर्माण झाली आहे.महिला मोठ्या प्रमाणावर धार्मिक आहेत.त्या भावनिक आहेत. त्यांच्या भावनांचा फायदा घेत त्यांना पूजा अर्चा, कर्मकांड, प्रवचने, धार्मिक कार्यक्रम, पारंपरिक सण उत्सव यात अडकून ठेवण्याचा कार्यक्रम विशिष्ट गटांनी हाती घेतलेला असून पदवीधर, विज्ञानाच्या सक्तक देखील या जंजाळात अडकल्या आहेत.सर्व सामान्य स्त्रिया, कष्टकरी महिला यांना मग आजच्या युगात कसे आणणार कोण आणणार ? जर सुशिक्षित म्हणविल्या जाणा–याच प्रवाह पतीत होत असतील तर मग सर्व सामान्य महिलांचा काय दोष ? याचा विचार समग्र महिलांनीच केला पाहिजे. महिला दिन साजरा करताना मोठमोठे समारंभ आयोजित करणारांनी आता या मुद्यांचा विचार करून काम केले पाहिजे.त्यांचा विविध क्षेत्रात काम करीत असल्याबद्दल सन्मान करा,ते आपले कर्तव्यच आहे मात्र त्याच बरोबर त्यांना सन्मानाचे जगणे देखील प्रदान करणे आवश्यक आहे. तसे वातावरण तयार झाले पाहिजे. त्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या निम्मे आहे. पण अजून त्यांना पुरूषी संस्कृती समान अधिकार देण्यास तयार नाही. उत्तर भारत, राजस्थान या राज्यात तर महिलांना दुय्यम दर्जा आहे. पैरकी जुती पैरमेही अच्छी है अशी त्यांची धारणा आहे.महाराष्ट्र त्या तुलनेत खूप पुढारलेला आहे

महाराष्ट्रात आता शैक्षणिक दागल्यावर,प्रापर्टी कार्डवर महिलांची नावे लावणे आवश्यक करण्यात आले हे अत्यंत पुरोगामी पाऊल महाराष्ट्राने उचलले आहे. एकिकडे अशा प्रकारे महिलांचा सन्मान करतानाच त्यांच्यासाठी कुठलेही क्षेत्र सुरक्षित राहिलेले नाही. अगदी त्यांना जे क्षेत्र सुरक्षित वाटत होते त्याही क्षेत्रात आता सुरक्षितता राहिलेली नाही. नोकरी साठी बाहेर पडणाऱ्या महिला आणि शिक्षणासाठी बाहेर पडणाऱ्या मुली आपल्या घरात सुरक्षित येई पर्यंत घरच्या लोकांचा जीव टांगणीला लागलेला असतो. पोलीस खात्यात महिलांच्या संरक्षणार्थ खास पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. तरीही अत्याचारांचे प्रमाण थांबलेले नाही. महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आणि इतर ठिकाणी महिलांसाठी आधी ३३ टक्के आणि नंतर ५० टक्के आरक्षण ठेवले. त्यामुळे महिला ग्रामपंचायतत सरपंच, नगरपालिकेत अध्यक्ष, जिल्हा परिषदेत अध्यक्ष आणि सभापती, पंचायत समितीत सभापती, महानगरपालिकेत महापौर, होऊ शकल्या. त्या चांगला कारभार करतात. आर्थिक दृष्ट्या देखील महिला आता सक्षम झालेल्या आहेत. तरीही पुरुषी अहंकार आडवा येत असल्यामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. म्हणूनच त्यांनी यापुढील काळात समाजाकडून संरक्षणाची अपेक्षा करणे चूक ठरेल. स्वतः चे संरक्षण स्वतः करण्यासाठी त्यांनी आता तयार व्हावे. त्यासाठी जे जे काही करावे लागणार आहे ते सर्व करणे क्रमप्राप्त आहे. त्याशिवाय तरणोपाय नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विधानसभेत तसेच लोकसभेत महिलांना आरक्षण नाही. काही राजकीय पक्ष त्यांना उमेदवारी देतात. पण ती पुरेशी नाही. त्यासाठी कायदा गरजेचा आहे. मात्र उत्तरेतील राज्यात महिला विरोधी राजकारण्यांची संख्या मोठी आहे. ते वारंवार सभागृहात महिला आरक्षणाच्या विरोधात भूमिका घेतात. त्यामुळे गेली वीस पंचवीस वर्षे महिला आरक्षण विधेयक पडून आहे. तरीही आम्ही स्वतःला पुरोगामी कुठल्या तोंडाने म्हणतो हा प्रश्न आहे. बऱ्याच महिला आता धर्माचा आधार घेऊन राजकारण करणाऱ्या पक्षात आहेत. त्यांच्या अंगात धर्म संचारला असून फार कडवट भूमिकेतून त्या बोलतात. अर्थात सर्वच महिला अशा नाहीत. ज्या आहेत त्या फार अपवादात्मक आहेत. त्यांच्या वक्तव्यांना मीडिया भरभरून प्रसिद्धी देतो.वैचारिक दृष्ट्या आक्रमक असणे एक वेळ आपण समजू शकू पण वैचारिक भूमिका नाही आणि बोलण्यातून दुस–यांची इज्जत घेणे एवढेच अनेकांचे काम आहे.या सर्व पार्श्वभूमीवर महिला राजकीय क्षेत्रात येण्यास तयार नाहीत. ज्या येतात त्यांना वखवखलेल्या नजरा सुखाने जगू देत नाहीत.अनेक वृत्ती प्रवृत्तींना तोंड देत त्या वाटचाल करीत असतात.त्यांना प्रणामच केला पाहिजे.

महाराष्ट्रातील पराक्रमी महिलांची मोठी परंपरा आहे. राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, अशा कितीतरी स्त्री रत्नांनी महाराष्ट्र समृध्द केलेला आहे.आधुनिक काळातील देश पातळीवरील अनेक महिलांनी पराक्रम गाजविला. श्रीमती ईंदिरा गांधी पंतप्रधान होत्या त्यांनी बांग्ला देशाची निर्मिती करुन सुवर्णाक्षरात लिहिली जाईल अशी कामगिरी केली. देशाच्या राष्ट्रपती पदी प्रतिभा ताई पाटील होत्या. सभापती महिला होत्या. अशी अनेक उदाहरणे देता येतील. स्वातंत्र्याच्या लढ्यात असंख्य महिला रस्त्यावर उतरल्या होत्या. कस्तुरबा, सरोजिनी नायडू, उषा मेहता, बेगम हजरत महल अशा अनंत महिलांनी देशासाठी तुरूंगवास भोगला.स्वातंत्र्य मिळाले. स्वराज्य मिळाले पण सुराज्य प्रस्थापित होऊ शकले नाही. असंख्य मागास, आदिवासी महिलांच्या जीवनात अंधार आहे.प्रकाशाची पहाट अद्यापि त्यांच्या जीवनात यायची आहे. तो दिवस येईल तेव्हाच महिला दिन ख–या अर्थाने साजरा होईल. विषमता प्रचंड असताना तो साजरा होऊ शकत नाही.शिवाय त्यांचे समाजातील बरोबरीचे स्थान निश्चित होणे आवश्यक आहे. अजून मोठा पल्ला गाठायचा बाकी आहे. त्यासाठी ज्या महिला सर्वार्थाने सक्षम झाल्या आहेत त्यांनी इतरांना सोबत घेतले पाहिजे. आपला प्रश्न सुटला म्हणजे सर्वांचा सुटला ही मानसिकता चुकीची आहे.तरूण मुली आता परंपरागत क्षेत्रांऐवजी नवनव्या क्षेत्रांचा शोध घेत आहेत.युध्दाच्या मैदानात देखील त्या उतरल्या आहेत.विमाने चालवित आहेत, रेल्वे, बसेस चालवीत आहेत. आय टी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मुली आहेत. कला क्षेत्रात,अभिनयात आहेत. खूप क्षेत्रे त्यांनी काबीज केली असली तरी संख्येच्या तुलनेत कमीच आहेत. तेव्हा संख्येच्या तुलनेत त्यांना संधी मिळाली पाहिजे. म्हणजे त्या सक्षम होतील. ती स्थिती निर्माण होईल तो सुदिन समजावा.

नंदुरबार जिल्हा बाल संरक्षण कक्षाला बालस्नेही पुरस्कार

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा बाल स्नेही पुरस्कार २०२४ हा नंदुरबार जिल्हा बाल संरक्षण कक्षाला जाहीर झाला असून नाशिक विभागातून बाल संरक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी या कक्षाला उत्कृष्ट जिल्हा बाल संरक्षण कक्ष म्हणून गौरविण्यात आले असल्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यु. पी. पाडवी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट, मुंबई येथे ३ मार्च २०२४ रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार डॉ. पंकज भोयर, संजय केळकर, मनिषा कायंदे, महिला व बाल विकास माजी आयुक्त प्रशांत नारनवरे, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शाह, आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत, आयोगाचे सदस्य नीलिमा चव्हाण, जयश्री पालवे, सायली पालखेडकर, संजय सेंगर व चैतन्य पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कारासाठी राज्यभरातील विविध शासकीय यंत्रणा आणि संस्थांकडून ११ वेगवेगळ्या श्रेणींमध्ये नामांकन मागविण्यात आले होते. निवड समितीने अंतिम निकषांच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. नंदुरबार जिल्हा बाल संरक्षण कक्षाने बालकांच्या हक्कांसाठी आणि संरक्षणासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.

शिरपूरला गौरव फाऊंडेशनच्या पाणपोईचा शुभारंभ

शिरपूर, दि.७- येथील निमझरी नाक्यावर गेल्या तीस वर्षांपासून गौरव फाऊंडेशनच्या वतीने पाणपोई चा उपक्रम सुरु आहे. आपला दिव्यांग मुलगा गौरवला लोकांना पाणी वाटण्याची आवड असल्याचे पाहुन ही सेवा सुरु आहे.

ग्रामीण भागातील लोकांची ये जा व कॉलनी परीसरचा मुख्य भाग असल्याने माणसांची वर्दळ असते,त्यांना उन्हाळ्यात पिण्यासाठी पाण्याची नितांत गरज असते.हे पाहुनच या पाणपोईचा उपक्रम सुरु आहे अशी माहीती फाऊंडेशनचे अध्यक्ष एम.के. भामरे यांनी दिली. यावर्षीही श्रीराम डोळ्यांचे हॉस्पिटल, लिनेस क्लब व आश्रय ट्रस्ट यांचे वतीने डॉ.राखी अग्रवाल व डॉ. आशिष अग्रवाल यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच जमलेल्या मान्यवरांनीही आपली देणगी दिल्याने या स्तुत्य ऊपक्रमात सर्वांचा सहभाग आहे. यावेळी आशाताई रंधे, कमलकिशोरजी भंडारी, संगीताताई देवरे, सुभाष झंवर, नानाभाऊ मच्छिंद्र गिरासे, अर्जुनदादा चौधरी, मिनाक्षी राठी, विजय बाफना, सौ. अनीता बाफना, रुपाली जैन, अशोक बाफना, नंदकिशोर भंडारी, डॉ.अनील पाटील, डॉ.अर्जुन पटेल, डॉ,साळुंके, प्रा.युवराज बेडीस्कर, सौ.विजया भामरे, जनरल मॅनेजर एल.सी. पाटील, ॲड.पंढरीनाथ अहिरे, भरत देसले, गिरासे, राजपुत, भटुभाऊ धनगर, सचीन खैरनार, जिभाऊ, निलेश वाघ, शब्बीरभाई, झिंगाभोई व गौरव फाऊंडेशन, लिनेस क्लब चे सदस्य हजर होते. प्रास्ताविक भामरे यांनी तर सुत्रसंचालन बेडीस्कर व विजु बाफना यांनी केले व आभार अर्जुन चौधरींनी मानले.

फागणे गावातून जाणाऱ्या बसेस थांबविण्याची प्रवाशांची मागणी

धुळे, दि.७- धुळे तालुक्यातील फागणे हे गाव तीस हजार लोकवस्तीचे गाव आहे. या परिसरात बारा ते पंधरा खेड्यांचा संपर्क येतो. फागणे येथून एस.टी.च्या जलद, अतिजलद तसेच रातराणी बसेस नियमित जातात. परंतू बसेस न थांबता निघुन जात असल्याने विद्यार्थी तसेच प्रवाशांची म ोठ्या प्रमाणावर गैरसोय होते. फागणे गावातून जाणाऱ्या व येणाऱ्या बसेस थांबविण्यात याव्यात. या मागणीचे निवेदन फागणे परिसर संघर्ष व समन्वय समितीच्या वतीने राज्य परिवहन महामंडळ विभाग नियंत्रकांना दिले आहे. पंधरा दिवसांच्या आत बसेस न थांबल्यास रास्ता रोको आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

फागणे हे गाव असलेतरी मोठी बाजारपेठ आहे. आर्थिक व्यवहारासाठी नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर संपर्क असतो. शैक्षणिक कामासाठी विद्यार्थी-विद्यार्थीनी तर कार्यालयीन कामासाठी, नोकरीसाठी तसेच मजुरीसाठी खेड्यापाड्यांवर जाणारे एस.टी.ने प्रवास करत असतात. त्यात महिला व ज्येष्ठ नागरिकांची संख्याही जास्त आहे. प्रवासी संख्या मोठी असल्याने परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना वेळोवेळी निवेदन देवूनही दुर्लक्ष केले जाते. चालक वाहक बस थांबवत नसल्याने प्रवाशांची कुचंबणा होते व खाजगी वाहनातून प्रवास करावा लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. वाहकांना दिल्या जाणाऱ्या मशिनमध्ये फागणे थांबा करून तिकीट देण्याची व्यवस्था करावी. जलद, अति जलद, रा-तराणीसह सर्व प्रकारच्या बसेसला फागणे येथे थांबा देण्यात यावा. पंधरा दिवसांत फागणे थांबा निश्चित करण्यात यावा. अन्यथा दि.१९ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता फागणे बस स्थानकाजवळ रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा विलास चौधरी, शिवाजी अहिरे, डॉ.कुणाल पाटील, सुभाष पाटील, बी.एन.सुर्यवंशी, भास्कर सुर्यवंशी, रोहिदास बडगुजर, नरेंद्र नंदवाळकर,गोपीचंद सुर्यवंशी, युवराज सुर्यवंशी, राजेश बडगुजर, नाना पाटील, कैलास चौधरी, दिपक चौधरी, गोकुळ सुर्यवंशी, किशोर पवार यांच्यासह गावातील अनेक नागरिकांनी दिला आहे.

धुळ्यात उद्या बौध्द धर्मीय वधु-वर मेळाव्याचे आयोजन

धुळे, दि.७- शहरातील साक्री रोड, सिंचन भवनच्या मागे लुम्बिनी वन उद्यान व बुध्दविहारर लुंबिनी वन परिसर येथे दि.९ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता लुम्बिनी वन बहुउद्देशीय संस्था व गुंजन महिला फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बौध्द समाजातील उपवर वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळाव्यात खान्देशासह मराठवाडा, विदर्भ, गुजरात, मध्यप्रदेशातील विविध पदांवर कार्यरत असलेले पद्वीधर, पद्व्युत्तर शिक्षित तसेच सरकारी, निम सरकारी, प्रथम वधु-वर घटस्फोटीत, विधूर, दिव्यांग, दहावी, बारावी शिक्षण घेतलेली उपवर वधु-वर एकत्र येणार आहेत. एकाच ठिकाणी जास्तीत जास्त स्थळांची परिचर व प्रत्यक्ष भेटण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रा.ईश्वरचंद्र खैरनार, संगिता खैरनार, बी.बी.साळवे, राजेंद्र थोरात, मेघना गायकवाड यांच्याशी संपर्क साधून म ेळाव्याच्या दिवशी सकाळी अकरा वाजता नोंदणी करावी असे नमुद केलेले आहे.

होळी उत्सव समिती अध्यक्षपदी लहामगे

धुळे, दि.७- ग.नं.६ मधील स्वतंत्र भांग्या मारूती विजय व्यायाम शाळेच्या सदस्यांची केतन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली बैठक नुकतिच घेण्यात आली. यावेळी होळी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सागर लहामगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या समितीत उर्वरीत पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी विक्की चौधरी, खजिनदारपदी तेजस चौधरी, स्वागताध्यक्ष राहुल गायकवाड, कार्याध्यक्ष समर्थ मुर्तडक, सचिव प्रशांत बोरसे, लाईट विभाग प्रमुख गणेश विभांडिक, सदस्यपदी मिहिर चौधरी, स्वाती लहामगे, राहुल चौधरी, बंटी चौधरी, सिध्दार्थ वाघ,नचिकेत चौधरी, अभिषेक जैन, दील लहामगे, जयनील चौधरी, सौरभ लहामगे, वेदांत चौधरी, भुषण मुर्तडक यांचा समावेश आहे. यावेळी भगवान करनकाळ, विजय बोरसे यांनी मार्गदर्शन केले. भगवान पाटील, भगवान चौधरी, अशोक बोरसे, छोटू चौधरी, बापू बागुल, भिका चौधरी, मांगीलाल चौधरी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री वैजनाथ महादेव मंदिरावर दर्शनासाठी भाविकांची गर्दी

शहादा,दि. ७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील चिखली दिगर येथील श्री वैजनाथ महादेव मंदिरावर महाशिवरात्रीनिमित्त भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिरावर दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती.

श्री वैजनाथ महादेव मंदिरावर सालाबादप्रमाणे या वर्षीही महाशिवरात्रीच्या दिवशी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बम...बम...भोले... हर... हर... महादेवाच्या गजराने संपूर्ण परिसर गजबजून गेला होता. चिखली दिगर, कानडी त.ह, चिखली बुद्रुक,शिरूर, उमर्टी या गावासह परिसरातील नागरिकांनी श्री वैजनाथ महादेव मंदिरावर दर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

महाशिवरात्री निमित्त उपवास असलेल्या भाविक भक्तांसाठी मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी साबुदाण्याची फराळ व थंडगार छाजची सोय केली होती. यावेळी ओम श्री वैजनाथ महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रसिंग सुमेरसिंग नाईक, उपाध्यक्ष पावभा हिरामण मराठे, सचिव गिरधर परशराम पाटील, खजिनदार मोहनसिंग विक्रमसिंग नाईक, विश्वस्त सुभाष देविदास पाटील, सुरेश सुमेरसिंग नाईक, प्रतापसिंग विक्रमसिंग नाईक, प्रकाश हिरालाल चौधरी, देविदास शामजी पाटील, जगदीश यशवंत पाटील, मनोज अमृत राठोड, मेहता मानसिंग जाधव, गणेश मक्कन पाटील यांच्या देखरेखीखाली मंदिरावर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच पुढच्या वर्षी म्हसावद येथील ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप चैत्राम धनगर हे महा प्रसाद देणार आहेत.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी कानडी त.ह, चिखली दिगर, चिखली बुद्रुक येथील अमृत छगन राठोड (गाव नाईक), मेहता मानसिंग जाधव, उपसरपंच संतोष हिरालाल जाधव, धीरू चंद्रभान जाधव, गणेश मक्कन पाटील, कानडीचे पोलीस पाटील शिवदास उखा चव्हाण, सनी दशरथ चौधरी, काशिनाथ मक्कन पाटील, भरत रामदास चौधरी, महेश परशराम चौधरी, रवींद्र पुजऱ्या ठाकरे, अमृत प्रतापसिंग नाईक, योगेश सुरेश नाईक, सोनू मोहनसिंग नाईक, शरद रघुनाथ चौधरी व युवक मंडळ आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

प्रकाश में आज दरवाजा

नोकरीचे अमिष दाखवून सात लाखांची फसवणुक

धुळे- देवपूर शारदा नगरातील सेवानिवृत्त इसमाच्या मुलाला नोकरी लावून देण्याचे अमिष दाखवून सात लाखांची फसवणुक केल्याची घटना उघडकीस आली आहे. मोहन बाबुलाल भावसार यांनी दि.४ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, नेहरू चौक संभाजी डेअरीच्या शेजारील चंद्रभान जव्हेरीलाल ओसवाल, दर्पण अनिल ओसवाल सर्व रा.धुळे व हरताली प्रसाद रामशंकर रा.मुंबई या तिघांनी मोहन भावसार यांच्या मुलाला नोकरी लावण्याचे अमिष दाखवून त्यांच्याकडून सात लाखांची रोख रक्कम घेतली. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे बनावट नियुक्तीपत्र तयार करून भावसार यांना देवून आर्थिक फसवणुक केली.

शब्दकोडे क्रमांक.२१०४



आडवे शब्द : १.पाताळ ४.वशिला ७.शिल्लक ८.सुसर १०.हिंदीत-हिंमत १२. शासनकर्ते १५.प्रियकर १७.सातु १९.सरळ एका रेषेतला वर खाली नसलेली जमीन २१.होकार-विरुदध २३.यद्यपि२४.इंग्रजी वर्ण मालेतील सतरावे वर्ण २५.कशासाठी २६.त्याप्रमाणे २७.मत्स्य,मासा,एक रास २९.पुरावा ३१.नाव,होडी ३२.अपमान ३४. आश्चर्यकारक ३७.आनंद ३८.मनास घातलेला बांध ३९.नुतन ४०.नीच ४२.आवडीच्या कामासाठी व्यस्त कामातून काढलेला वेळ ४४.नायिका, आकाशातील चांदण्या ४६. दु:खदायक, भयंकर - हिंदीत ४८.चित्त ५०.सबब ५२.नऊ ५३.संन्यासी,भिक्षूक ५४.पन्नास आणि दोन मिळून तयार होणारी संख्या ५५.इंग्रजीत-बदक उभे शब्द : १.मनोहारी २.एक प्रकारचे टिकाऊ लाकूड ३.दया ५.फांदी,शाखा,रजा देणे ६.सज्जड दम ७.पाणी ९.चौक ११.जन्म १३.पथ १४.फळातील द्रव १५.आंब्याची किंवा फणसाची पोळी १६.दर्पण १८.जड २०.गुणांची केलेली कदर २२.कैची २७.सखा,प्रियकर २८.संपत्ती २९.दानशूर ३०.रोपांची केलेली जोपासना ३१.हिंदीत-तेव्हा ३२.कैफ किंवा आणणारे सौंदर्य,नशा ३३.लोभ ३५.कलाबूताने विणलेले वस्त्र,ताप,संकेतार्थी अव्यय ३६.निवेदन करणारा ३७.किंमत ३८.रुची ४०.खाटीक ४१.भित्रा ४३.मालिश ४५.लमाणांचा तांडा ४७.पसंत नसलेला ४९.घट ५१.बनाव

शब्दकोडे क्रमांक.२१०३ चे उत्तर

अ	यो	ध्या		ता	प	ट		पा	प	ड	
स		न	व	ल		क	रं	ग	ळी		र
र	न		र		धा	म		ल		स	म
	मा	ळ		म		क	ला		स	ह	ल
सा	ज		दा		मा		व	न	रा	ज	
व		का	म	ना		रा	णी		व		के
ली	ट	र		रा	ह	त		अं		बा	र
	मा		बा	ज		रा	ह	ग	र		वा
क	ट	क	ट		म	णी		ण		हा	
पा	र	वा		भ	ग्न		स		म	हा	न
ळ		ड	म	रू		वि	वा	द		का	दी
	पी		र	च	ना		ल		घ	र	

धुळ्यात एस.टी.कामगार संघटनेची विविध मागण्यांसाठी निदर्शने

धुळे,दि.७-महाराष्ट्रएस.टी. कामगार संघटनेच्यावतीने राज्यभर प्रलंबित मागण्यांच्या पुर्ततेसाठी प्रत्येक आगार युनिटच्या प्रवेशद्वारा जवळ निदर्शने करण्यात आली. त्या अनुषंगाने धुळ्यातही निदर्शने करण्यात आली.

कामगारांच्या विविध मागण्यां मध्ये दि.१ एप्रिल २०२० पासून देण्यात आलेल्या पगारवाढीचा एक एप्रिल २० ते ३१ मार्च२०२४ पर्यंतच्या फरकाची थकबाकी देण्यात यावी. राज्य शासनाप्रमाणे महागाई भत्ता फरकासह ५३ टक्के दराने देण्यात यावा. २०१६ ते २०२० चा घरभाडे भत्ता एक टक्के कमी दराने दिला होता तो तीन टक्के दाराने देवून थकबाकीसह देण्यात यावा. पि.एफ. उचल सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे, ती त्वरीत मिळावी. आदिंचा समावेश आहे. आंदोलनाची दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिपक पांडव, संतोष वाडीले, डी.आय.राजपूत, संजय पररदेशी, आर.के.महाजन, जे.डी. पाटील, आर.एस.बाविस्कर, एस.पी.बागले, महेंद्र सनेर, जी.व्ही.पाटील, प्रमिला दीक्षित, निलीमा नेतकर, स्वप्ना चौधरी, कोमल ठाकूर, गोपालभाऊ ठाकरे, आर.एन.पाटील, विनोद पवार, नामदेव पाटील, गोरख भोई, जितेंद्र कल्याणकर यांसह अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहा विद्यालयाच्या मागील बाजूस रस्त्यावर गतिरोधक टाका : मागणी

शहादा, दि.७ (प्रतिनिधी)- शहरातील शेठ व्हि.के.शहा विद्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या एचडीएफसी बँक पासून प्रकाशा रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यावर गेल्या तीन महिन्यापासून अवजड वाहनांची वाहतूक तसेच रहदारी मोठ्या प्रमाणात वाढल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या शाळकरी व महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अवजड वाहतुकीमुळे अपघाताची शक्यता निर्माण झाल्याने नगरपालिका प्रशासनाने त्वरित तीन ते चार ठिकाणी गतिरोधक टाकण्यात यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. वेळप्रसंगी तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा देखील दिला आहे.

डामरखेडा जवळील गोमाई नदी पुलावरील वाहतूक बंद आहे तर शहादा शहराला लागून तिखोरा गावाजवळील गोमाई नदीवरील पुलाचे बांधकाम सुरू असल्याने वाहतूक शहादा शहरातून कुकडेल मार्गे सुरू आहे. दररोज शेकडो वाहने सरळ गांधीनगर वसाहतीतून विकास हायस्कूलच्या मागील बाजूस असलेल्या मुख्य रस्त्याने सरळ प्रकाशा रस्त्याकडे जातात. अवजड मध्ये मोठाले ट्रॉला देखील जात आहेत. या रस्त्याला लागून प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा व महाविद्यालय असल्याने मोठा अपघात व अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोठा अनर्थ घडल्यास नगरपालिका प्रशासन त्याला जबाबदार राहील. नागरिकांमध्ये कमालीच्या रोष व्यक्त केला जात आहे. त्वरित गतिरोधक न टाकल्यास परिसरातील नागरिक आंदोलनाच्या मार्ग स्वीकारतील असा इशारा दिला आहे.

नवापूर पालिकेतर्फे महिलांसाठी कायदेविषयक शिबिर संपन्न

नवापूर, दि.७ (प्रतिनिधी)- नवापूर नगरपालिका महिला बालकल्याण विभाग आणि डे एन.यु.एल.एम.अंतर्गत जागतिक महिला दिना निमित्त महिला कल्याण योजना व कायदेविषयक मार्गदर्शक शिबिर मेळावा नवापूर नगरपालिका सुरुपसिंगजी नाईक टाऊन हॉल येथे आयोजित करण्यात आले होता.

या कार्यक्रमाचे व्यारव्यात्या सहयोगी प्राध्यापक शहादा येथील प्रा.डॉ. मृणाल जोगी या होत्या. यावेळी उपस्थित मान्यवराचा सत्कार समुदायक संघटक मिनाक्षी वळवी, भाग्यश्री महिला बचत गटाचा अध्यक्षा कुंदन पाटील यांनी केले. प्रमुख अतिथी मार्गदर्शक प्रा.डॉ मृणाल जोगी, युनियन बँक ऑफ इंडिया नवापूरव्यवस्थापककल्पेशशेटे,स्टेट बँक ऑफ इंडिया चे व्यवस्थापक अतुल देभाजे, बँक ऑफ महाराष्ट्र नवापूर चे व्यवस्थापक निलम चौधरी, मुख्यधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी अविनाश गांगोडे, प्रशासकीय अधिकारी प्रियंका आव्हाड, आरोग्य निरीक्षक अशोक साबळे, प्रकल्प अधिकारी प्रशात भट आदी उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ.मृणाल जोगी म्हणाल्या की एकवीस सहाव्या शतकात महिलानी घराचे बंद दरवाजे उगडुन पुढे आले पाहीजे स्वताचा पायावर उभे राहुन कुंटुब व समाजाची प्रगती करावी तसेच महिल्यासाठी राबविल्या जाणा-या शासकीय योजनाच्या जास्ती जास्त उपयोग करुन घ्यावा. महिला म्हणून मागे राहु नये महिला हीच कुंटुब व समाजाचा आधार आहे. या नंतर मुख्यधिकारी अविनाश गांगोडे यांनी आपले अध्यक्षीय भाषणात महिलानी स्वतासाठी जगण्यास शिकावे बचत गट कागदावर न ठेवता त्याच्या फायदा घेऊन अधिक अधिक योजनाचा लाभ घ्यावा व कुंटुबाची प्रगती करावी काही अडचणी असल्यास नवापूर नगरपालिका तुम्हा सर्व प्रकारची सहकार्य करेल असे सांगितले या नंतर बचत गटाचे उत्कृष्ट कार्यकरणा-या गटाना प्रशस्ती पत्र व गौरव चिन्न देऊन महिला बचत गटाचा सन्मान करण्यात आला.

गोदावरी विद्यालयात विविध प्रयोगांनी विज्ञान दिवस साजरा

म्हसावद, दि.७ (प्रतिनिधी)- येथील प.पू. सती गोदावरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान दिवस साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्य सुरेखा गुजर पर्यवेक्षिका संगीता जयस्वाल, प्रमुख अतिथी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष अँड.संगीता पाटील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश पाटील उपस्थित होते. प्रसंगी सी.वी. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ॲड.संगीता पाटील यांनी हात चालाखी आणि विज्ञान यातील फरक समजावून सांगताना विज्ञान आणि अंधश्रद्धा यातला फरक समजून घेणे डोळस असण्याचे लक्षण आहे बऱ्याचदा हात चालाखी व प्रसंगावधान यांच्या मेळ करून कार्यभार साधला जातो विज्ञान हे स्थळ काळ व व्यक्ती निरपेक्ष असते असे सांगितले. प्रसंगी हर्षाली गवळे, समीक्षा अहिरे, कनिष्का वाघ, उन्नती जाधव, रोहित गिरासे, कल्याण वाघ, धनश्री सावंत, हर्षित अहिरे, नम्रता मराठे या विद्यार्थ्यांनी चमत्कारी घंटी, चमत्कारी दोरी, भविष्यवाणी पवित्र अंकांची, नारळाच्या साह्याने जमिनीखाली पाणी शोधणे, दैविक प्रभावाने आरसा फोडणे, नोट फाडणे व चिटकवणे अशी विविध जादूचे प्रयोग सादर केले. कार्यक्रमाची प्रस्तावना पूनम पटेल यांनी केले. प्रसंगी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन भावना गुजर तर आभार योगेश पाटील यांनी मानले.

पटेल शैक्षणिक संकुलतर्फे शाळा गुणवत्ता मूल्यांकन कार्यशाळा उत्साहात

शिरपूर, दि.७- शिरपूर एज्युकेशन सोसायटी व आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट तर्फे आयोजित शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा या विषयावर मार्च रोजी एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य समन्वयक, प्रशिक्षक व समुपदेशक असिफ लतीफ शेख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या पूजनाने व दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, संस्थेचे अकॅडमिक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक बाविस्कर, संस्थेतील प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. असिफ लतीफ शेख यांनी शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा कसा भरावा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याबद्दल उपस्थितांना माहिती करून दिली. विद्यार्थ्यांमध्ये क्षमता वृद्धी व कौशल्यांची जोपासना कशी करावी याबद्दलही त्यांनी सविस्तर माहिती दिली.

इंदुभाई भदाणे प्रतिष्ठानचे स्त्री शिक्षणासाठी पुढचे पाऊल आधार नसलेल्या विद्यार्थीनींना भदाणेंनी घेतले दत्तक

धुळे, दि.७- शिक्षण हे स्त्री उद्धाराचे अन समाज परिवर्तनाचे एक महत्वपूर्ण साधन आहे. कुटुंबातील एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंबाची प्रगती होते. बौध्दीक क्षमताही उत्तम व शिकण्याची इच्छाशक्तीही दांडगी, असे असतांनाही केवळ आर्थिक चणचणमुळे काही मुलींना पुढील शिक्षण घेता येत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीतही स्त्री शिक्षणाची ही चळवळ अखंडपणे सुरू राहावी म्हणुन, इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान अव्याहतपणे प्रयत्न करीत आहे.

आई- वडील यापैकी एक वा दोन्ही छत्र हरपलेल्या व आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या मुलींना, मायेची सावली देण्याचे काम इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान करीत आहे. दत्तक घेतलेल्या मुलींचा, शिक्षणाचा भार प्रतिष्ठानने उचलला असुन उच्च शिक्षणापर्यंत यात सातत्य असणार आहे. प्रतिष्ठानच्या सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांच्या संकल्पेतून ही अभिनव चळवळ बोरी पट्ट्यासह तालुक्यात सुरु आहे. बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानने सामाजिक क्षेत्रासह अनेक क्षेत्र पादाक्रांत केलीत. प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब रावण भदाणे तसेच सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनीताई बाळा साहेब भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण, आरोंग्य, धार्मिक, महिला सक्षमीकरण, सांस्कृतीक, प्रबोधन, युवक कल्याण, कृषी, ग्रामविकास, आदी क्षेत्रात प्रतिष्ठानने चालवलेली चळवळ वाखाणण्याजोगी आहे. हे कार्य सुरु असतांनाच, भदाणे दाम्पत्याला मुलींना शिक्षणात येणाऱ्या अडचणीं प्रकर्षाने जाणवल्या. मुलींसाठी मोफत शिक्षणाचा दावा शासनाकडुन होत असला तरी, शैक्षणिक फी व गणवेश वगळता अनेक खर्चीक बाबी काही पालकांपुढे आ वासून उभ्या राहतात आणि पर्यायाने मुलींचे शिक्षण थांबवले जाते. विशेषत: ज्या मुलींचे वडील किंवा आईचे निधन झाले असेल, किंवा दोन्हींचे निधन झाले असेल अशा मुलींना यात जास्त अडचणी येतात. अशा मुलींना आधार देण्याचे प्रतिष्ठानने ठरवले व प्रत्यक्ष काम सुरु झाले. प्रतिष्ठानच्या सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनीताई बाळा साहेब भदाणे यांच्या संकल्पेतून, अशा नाजुक परिस्थिती असलेल्या मुलींच्या दातृत्वाचा भार घेण्यास आला आहे. गेले अर्ध तप हे काम अव्याहतपणे सुरु आहे. दरवर्षी मुली दत्तक घेण्यात येतात, त्यांचा उच्च शिक्षणापर्यंतच्या प्रवासात प्रतिष्ठान पाठबळ देणार आहे. प्रतिष्ठानने यापूर्वीही महिला सक्षमीकरणासाठी अनेकविध उपक्रम राबविले आहेत. यात अभिनेते मकरंद अनासपुरेच्या उपस्थितीत भव्य महिला सक्षमीकरण मेळावा, महिला उद्योजकता चर्चासत्रांचे आयोजन करणे, महिलांसाठी तीन दिवसीय मोफत सहल आयोजन करणे, युवकांबरोबरच युवतींसाठी मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत करणे, आदी उपक्रम नारी शक्तीसाठी राबविले जातात.

६ वे पुण्यस्मरण

कालकथीत गिरधर पिराजी पेंढारकर

मृत्यू दि.८/३/२०१९

सरले जीवन, विरले दर्शन, उरल्या केवळ स्मृती व्याकुळ नेत्र आज आपणास श्रद्धांजली अर्पिती!

-------: शोकाकुल :-------

गं.भा.सखुबाई गिरधर पेंढारकर (पत्नी)
आयु.उखा पिराजी पेंढारकर (भाऊ)
आयु.दिनेश गिरधर पेंढारकर (मुलगा)
आयु.सुभाष गिरधर पेंढारकर (मुलगा)
आयु.दिलीप गिरधर पेंढारकर (मुलगा)
आयु.माधव गिरधर पेंढारकर (मुलगा)

समस्त पेंढारकर परिवार, आमोदा

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे, पैकी मौजे वलवाडी येथील स.नं.३२/१/२/३ पैकी प्लॉट नं.२१/ब चे एकूण क्षेत्र ५२५.७५ चौ. मी. या पैकी उत्तरेकडील पश्चिमकोपऱ्यातील भागाचे क्षेत्र ११३ चौ. मी. ची मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस : वापर व पुढे रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. २१/अ, उत्तरेस :स.नं. ३९/२, दक्षिणेस : प्लॉट २१ ब चा भाग येणे प्रमाणे वर्णनाचा आतील मिळकत ही **श्री. विलास रमेशचंद्र जैन** रा. ३,८० फुटी रोड, नटराज कॉलोनी जवळ, धुळे यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकती ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून ब्याना सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहाराबाबत हरकत असल्यास, मिळकतीवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर मिळकतसंबंधी कोणत्याही प्रकारचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ - धुळे, दि. ०७/०३/२०२५

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल
ग. नं. ४ भांडी बाजार, कांती कॉम्पलेक्स शेजारी, धुळे
मो. नं. ७७०९७७२७५७/७५८८८८४१०७

श्रीमती वैशाली हिंगे, अपर तहसीलदार धुळे शहर यांचे न्यायालयात

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ याचे कलम ३२ ग (१) अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस (नियम १७)

कुळवहिवाट केस क्र-०२/२०२५

ज्याअर्थी, मुबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ याच्या कलम ३२ अन्वये प्रत्येक कुळाने कलम ३२ यात दिलेल्या शर्तीस अधीन राहून, त्याने कुळ म्हणून धारण केलेली जमीन खरेदी केली आहे असे समजण्यात येते आणि ज्याअर्थी, ती जमीन खरेदी करण्याची कुळाची इच्छा आहे किवा कसे हे कलम ३२ ग पोटकलम (३) व (४) याद्वारे निश्चित करणे व त्याची तशी इच्छा असल्यास, जमिनीची खरेदी किमंत ठरविणे हे न्यायाधिकरणास भाग आहे.

त्याअर्थी, आता खाली नमूद केलेली व्यक्ती म्हणजे
अ) ज्या कुळांनी कलम ३२ अन्वये धुळे जिल्हातील धुळे तालुक्यातील धुळे शहर गावातील जमिनी खरेदी केल्या आहेत असे समजण्यात येते अशी सर्व कुळ,
ब) अशा जमिनीचे सर्व जमीनमालक जमीन मालक
क) त्यात हितसंबंध असलेले इतर सर्व व्यक्ती,

यास, ह्या नमुन्यास जोडलेल्या अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या, जीत त्याचा हितसंबंध असेल अशा जमिनीसमोर दर्शविलेल्या तारखेस व वेळी अपर तहसीलदार कार्यालय, धुळे यांचे दालन या ठिकाणी न्यायधिकरणापुढे हजर राहण्याविषयी फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतेही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून, नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील. तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालू राहील.

अनुसूची

भूमापन क्रमांक	क्षेत्रफळ	तारीख	वेळ
२४३/अ/६	क्षेत्र ० हे ४६ आर	११/०३/२०२५	सकाळी ११.००

ठिकाण :- धुळे, दिनांक :- ३/३/२०२५

(वैशाली हिंगे)
शेतजमीन न्यायाधिकरण
तथा अपर तहसीलदार धुळे शहर

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हित संबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **श्री.कैलास दायनंद पंजाबी** रा. मुकटी ता. जि. धुळे, यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदे करार केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे, सदर मिळकतीच्या टायटल व्हेरिफिकेशन हेतू सदर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वगैरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबद्दल स्वत:च्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजित मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे. असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी, कळावे.

परिशिष्ट :- मौजे सबगव्हाण खुर्द ता. पारोळा जि. जळगाव येथील गट नं. १०८ चे एकूण क्षेत्र ला. ला. ०४ हे. ४७ आर+पो. ख. ०१.०३ आर असे एकूण क्षेत्र ०५ हे. ५० आर. यांसी आकार रु. ६.२० पैसे मात्रची असलेली शेत जमीन मिळकत यासी चतु:सिंमा येणे प्रमाणे असे.

पुर्वेस : गट नं. १११ पश्चिमेस : गट नं. १०९
दक्षिणेस : गट नं. १०४ उत्तरेस :गट नं. ११०

सदर जाहीर नोटीस आशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. ०५/०३/२०२५

ॲड.राजेश नंदलाल अग्रवाल मो.नं.९८५००९२७५३
५, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, धुळे जिल्हा कोर्टासमोर, स्टेशनरोड, धुळे ४२४००१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ९/२/१/३ पैकी प्लॉट नं. ७८ चे क्षेत्र २१० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : गट नं. ८, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ७७, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) जयश्री भालचंद्र चौधरी, २) प्रितेश भालचंद्र चौधरी, ३) प्रियंका भालचंद्र चौधरी तिघे रा. राजयोग हौ. सो. शांती निकेतन कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. या व्यतिरिक्त सदरहू मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, कब्जापावती, मृत्यूपत्र,मुखत्यारपत्र, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाचा आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक : ०७/०३/२०२५

ॲड.विजय म.मोरे
नोटरी -भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे मो. नं. ९८२२८५२६५०.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ५९/१ या पैकी प्लॉट नं. २ चे एकूण क्षेत्र ३००० चौ. फुट वि. सि. स. नं. २९९० चे एकूण क्षेत्र २७०.२० चौ. मी. सत्ता प्रकार क यापैकी पश्चिमेकडील भागाचे सात बारा उताऱ्याप्रमाणे क्षेत्र १०१.७२ चौ.मी. व सि. स. उताऱ्याप्रमाणे क्षेत्र १०० चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉटनं. २ पैकी भाग, पश्चिमेस : प्लॉट नं. ३, दक्षिणेस : नाला, उत्तरेस : रस्ता, येणे प्रमाणे वर्णनाचे बांधीव घर व उर्वरित बखळ जागेसह मिळकत **श्री. ओंकारमल बालुराम जांगीड** रा. २, जगन्नाथ नगर देवपूर, धुळे यांचे मालकीचे असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे आशिलांशी केला आहे.

आमचे आशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यानिशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरची नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचे मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक: ०७/०२/२०२५

ॲड.विजय म.मोरे
नोटरी -भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे मो. नं. ९८२२८५२६५०.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

७/१२ उताराप्रमाणे -स. नं. ४१२/१क/+१ड पैकी प्लॉट नं. १० चे एकूण क्षेत्र १३०.०० चौ. मी. बखळ प्लॉट.

सि. स.नं. उताराप्रमाणे - सि. स. नं. १३८७९ चे एकूण क्षेत्र ११८.३० चौ. मी. बखळ प्लॉट हे १) **अब्दुल कय्युम मोहम्मद हसन अन्सारी, २) जावीद एकबाल अब्दुल कय्युम अन्सारी, ३) मोहमंद रफी मोहमद ताहीर अन्सारी,**सर्व रा. धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशा प्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदे करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवयकच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे आशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०७/०३/२०२५

ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८०फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे **मो. ९८८१९२९४२४**
(नोटीस देणारतर्फे ॲडव्होकेट)

जाहीर नोटीस

तमाम जनतेस वित्तीय कंपन्या, बँका, पतसंस्था, ई व संबंधितांना सदर जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत ही आमचे अशिल हे खरेदी करणार असून मिळकतीचे मालक यांच्याशी सौदापावती करार केला आहे. त्यानुसार बयाणा म्हणून रक्कम दिली आहे. त्यानुसार आमचे अशिल लवकरात लवकर खालील नमूद मिळकतीचे खरेदीखत नोंदविणार आहे.

सबब खालील वर्णनाच्या खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर सदर मिळकतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, अधिकार, हितसंबंध, गहाण, तारण, बोझा, जामीन, सौदेकरार, कोर्ट कचेरी व कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हक्काच्या कायदेशीर कागदपत्रांसह खालील पत्त्यावर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत तथाकथित हक्काच्या कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी. परस्पर दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाही.सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रासह प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्बोझ व निर्वेध असून ती विक्री करण्याचा मिळकतीचे मालक यांना पूर्ण कायदेशीर अधिकार आहे असे मानून आमचे अशिल खरेदीची रक्कम अदा करुन खरेदीखत नोंदवून घेतील व व्यवहार पूर्ण करतील आणि सदर मिळकतीचे बोनाफाईड खरेदीदार म्हणून प्रत्यक्ष कब्जासह कायदेशीर मालकी हक्क, प्राप्त करतील. मग त्यानंतर कोणीही कोणतेही तथाकथीत हक्क व अधिकार सदर मिळकतीबाबत दाखविल्यास व वाद उपस्थित केल्यास ते आमचे अशिलांवर तसेच सदर मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- मौजे सरवड ता. जि. धुळे हद्दीतील गट नं. ३३८/२ क्षेत्र ला. लायक ० हे. ८६ आर. आकार १ रु. ५५ पैसे विहीर क. सामाईक ० हे. ८६ आर. त्यासी चतु:सिमा १) पुर्वेस : गट नं. ३२८ चा भाग, २) पश्चिम : गट नं. ३४३, ३) दक्षिण :

पान १ वरुन

प्रथमच महिलांच्या विषयांसाठी ग्रामसभा

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे आभार मानले आहेत. राज्यात पहिल्यांदाच महिलांच्या विषयांकरिता विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा मैलाचा दगड असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्य महिला आयोगाने दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी याबाबत कार्यवाही करण्याकरिता ग्रामविकास विभागाला पत्राद्वारे कळविले होते. तसेच केंद्र शासनाच्या पंचायती राज विभागाच्या अप्पर सचिवांनी देशातील सर्व राज्यातील ग्रामविकास सचिवांना दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रान्वये जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभा आयोजित करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

वायूसेनेचे फायटर जेट जग्वार क्रॅश

नियमित प्रशिक्षणाचे उड्डाण करीत होते. त्यानंतर अंबाला दरम्यान या जग्वार फायटरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ते दुर्घटनाग्रस्त झाल्याचे भारतीय वायूसेनेने म्हटले आहे. पायलटने विमानाला सुरक्षित रूपाने गावाच्या दाट वस्तीच्या हद्दीबाहेर नेण्यात यश आल्याने अनेक गावकऱ्यांचे प्राण वाचल्याचे म्हटले जात आहे. वायुसेनेने सोशल मीडिया प्लेटफॉर्म एक्सवर म्हटलेय की, भारतीय वायुसेनेचे एक जग्वार फायटर जेट विमान सिस्टीममध्ये दोष निर्माण झाल्याने क्रॅश झाल्याचे म्हटले आहे. या अपघाताच्या घटनेचे सत्य बाहेर येण्यासाठी वायुसेने चौकशीचे आदेश दिले आहेत.

रमाई महिला मंचचा पाठिंबा

म्हणजे बुद्धगया मंदिर कायदा १९४९ रद्द झाला पाहिजे अशी मागणी केली आहे.भारतातील हिंदुच्या मंदिरात सर्व हिन्दू ट्रस्टी आहेत. ख्रिश्चनांच्या चर्चमध्ये ख्रिश्चन ट्रस्टी आहेत.मुस्लिमांच्या मस्जिदमध्ये मुस्लिम मौलाना ट्रस्टी आहेत. जैन मंदिरात जैन ट्रस्टी आहेत. तसेच शिखांच्या गुरुद्वारात शिख धम्मगुरुच ट्रस्टी आहेत.मग महाबोधी महाविहारात पुरोहित ब्राम्हण ट्रस्टी का? व त्यांच्या ताबा का? भारतासह जगभरातील आम्हा सर्व बौद्धांचे धार्मिक स्थान असलेले बोधगया येथील महाबोधी महाविहाराचा ताबा पुरोहित ब्राम्हण यांच्याकडून काढून बौद्ध धम्मगुरु यांच्या स्वाधीन करावे. तसेच बुद्धगया मंदिर १९४९ चा कायदा त्वरित रद्द करावा. अशी मागणी सर्व विविध महिला सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. मागण्या मान्य न झाल्यास वेळ प्रसंगी येणाऱ्या काळात संविधानिक सनद मार्गाने मोठे आंदोलन उभारण्यात येईल. बुद्धगया बिहार येथील महाबोधी महाविहार पुरोहित ब्राम्हणांच्या कब्जातून मुक्त करुन महाबुद्ध मंदिर १९४९ चा कायदा रद्द व्हावा.निवासी नायब तहसीलदार यांना निवेदन देऊन त्यांच्या मार्फत भारताचे महामहिम राष्ट्रपति द्रोप्रदी मुर्मू तसेच भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सुपुर्द करावे अशी मागणी तालुका शहादा येथील विविध महिला संघटने मार्फत करण्यात येत आहे. बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क महिला संघ, रमाई महिला मंचच्या अलका जोंधळे, अर्चना निकुंभे, उषा खैरनार, शालिनी मोहिते, उषा ईशी, कविता कुवर, सुकेशनी पानपाटील, वैशाली पवार ,पुष्पा बिऱ्हाडे, करुणा बळसाने, कोमल दिवेकर, स्मिता मंगळे आदि महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

शिलकीचा सादर केला अर्थसंकल्प

वेगवेगळ्या श्रेणीत विभागणी करण्यात आली आहे. विद्यार्थी व वाचकांचे हित लक्षात घेता शहरात तीन अभ्यासिका आ.फारूक शाह, आ.मंजुळा गावीत यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या आहेत. शहरात संविधान भवनाची उभारणीही लवकरच करण्यात येणार आहे. त्यासाठी पंधरा कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. शहरासाठी २८ ई-बसेस केंद्र शासनाकडून मिळणार आहेत. महापालिकेचा पेट्रोल पंप साक्री रोडवरील शाळा क्र.१४ येथे सुरू करण्यात येणार आहे. तसेच बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांसाठी चार चार्जिंग स्टेशनही सुरू करण्यात येणार आहेत. प्रभात नगरात वर्किंग वूमन्ससाठी स्वतंत्र होस्टेल उभारण्याची तरतुद करून केंद्राकडे निधी उपलब्ध करून घेवू.श्वानदंशामुळे बालिकेचा मृत्यू झाला. श्वानांच्याबाबतीत कारवाई करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, त्यासाठी निर्बिजीकरणसाठी दीड कोटींची तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी महापालिकेतून मिळणारी आवश्यक ती कागदपत्रे मिळण्यासाठी हद्दवाढीतील गावांसाठी सोयीचे व्हावे यासाठी दोन प्रभाग कार्यालये उघडावे अशी मागणी केली. त्यानुसार एक कोटीची तरतूद यात करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरेंनी गजानन कॉलनी परिसरात पोलीस चौकी उभारण्याची मागणी केली. त्याअनुषंगाने तरतुदीचा समावेश करण्यात येणार आहे.

पहिल्यांदा अर्थसंकल्प सादर केला त्यावेळी मनपाची झोळी खाली होती, त्यावेळी देणी देण्याची जबाबदारी होती. पाच रूपयांच्या उत्पन्नावर पाचशेचा खर्च अशी अवस्था होती. यावेळी खर्चाला फाटा देण्याचे काम केले आहे. एक हजार गाळ्यांची उभारणी करून मनपाच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न केले जाणार आहे. पाच कंदील पैकी तीन मार्केटचे काम करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. मालमत्ता कर वसुलीसाठी ढोल बजावो, थेट संपर्क साधण्याचे काम सुरू आहे. ढोल वाजवूनही थकबाकीदारांना त्याचा आवाज पोहचत नाही. आता काय केलं पाहिजे. अशी खंतही आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी व्यक्त केली.

दुचाकी लंपास करणारा आरोपी जेरबंद

चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. श्रीराम पवार यांना मिळालेल्या माहितीनुसार देवपूर अजय लॉन्स येथून गोपाल ऊर्फ भुऱ्या देविदास पाटील (वय ३८) रा.जयशंकर कॉलनी, हनुमान मंदिरासमोर, मोहाडी उपनगर,धुळे याला ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने एकुण आठ दुचाकींची चोरी केल्याची कबूली दिली. त्याच्याकडून सव्वा दोन लाख रूपये किंमतीच्या आठ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. यातुन चार दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यात चाळीसगाव रोड, देवपूर, शिरपूर शहर आणि पंत नगर पोलीस स्टेशन, ठाणे मुंबई या पोलीस स्टेशन हद्दींचा समावेश आहे.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. श्रीराम पवार, सपोनि. श्रीकृष्ण पारधी, पोउनि. अमरजित मोरे, असई. संजय पाटील, पोहेकॉ.दिनेश परदेशी, चेतन बोरसे, प्रशांत चौधरी, हर्षल चौधरी, विनायक खैरनार, विवेक वाघमोडे, राजीव गिते यांनी केली.

चाळीस कोटी अठ्ठेचाळीस लाखांचे अंदाजपत्रक

सुधारीत व सन २०२५-२६ च्या ४० कोटी ४८ लाख रुपयांच्या मुळ अंदाज पत्रकास मान्यता देण्यात आली आहे. या अंदाज पत्रकामध्ये मानव विकास निर्देशांकाशी संबंधीत आरोग्य, शिक्षण, ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत योजनांवर विशेष भर देण्यात आला आहे. बांधकाम विभागांतर्गत ग्रामीण रस्ते, विशेषतः संपर्क विरहीत गावांना साकव पूल, लघुसिंचन विभागांतर्गत विकास योजना, महिला व बालविकास विभागांतर्गत विकास योजना, समाजकल्याण, दिव्यांग कल्याण आदी योजनांवर निधीची तरतूद करण्यात आली आहे.

नारी-शक्ती निर्धार महिला महोत्सव

विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन देखील लायन्स फेमिना क्लबतर्फे करण्यात आले असून युवकांसाठी सकाळी १० ते २ वाजेदरम्यान ला.पिनल शाह यांच्या मार्गदर्शनाने व महिलांसाठी दुपारी २ ते ५ दरम्यान सौ.सुप्रिया कोतवाल यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. यावेळी विविध मनोरंजनपर कार्यक्रमांसोबत येथील स्मित हॉस्पीटलतर्फे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी होणार आहे. याचबरोबर भव्य रक्तदान शिबिरदेखील घेण्यात येणार आहे. महिला दिनानिमित्ताने का होईना चला एकदिवस बालपण जगुया, आपल्या आवडीचे व आपल्या मातीतले विविध मनोरंजनात्मक व मैदानी खेळूया, असे आवाहन संयोजिका डॉ.तेजल चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन सौ.चेतना चौधरी, लायन्स फेमिना अध्यक्षा सौ.मिनल म्हसावदकर, सेक्रेटरी सौ.पुनम बेडसे, ट्रेझरर दिपा वाडेकर, सौ.हिना रघुवंशी, सिमा मोडक, सौ.शितल चौधरी, चेतना शहा, कांचन मुलाणी, सुलभा महिरे, रंजना बोरसे, किरण गायकवाड, सुरेखा वळवी, आचल तोष्णीवाल, रागिनी पाटील, जया जैन, सारिका जमादार तसेच सर्व लायन्स फेमिना सदस्यांनी केले आहे.

तळोद्यात राजकीय भूकंप; ठाकरे, शरद पवार गटातील असंख्य पदाधिकाऱ्यांच्या मुंबईत शिंदेसेनेत पक्षप्रवेश

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे तळोदा तालुक्यातील शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातील पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. पदाधिकाऱ्यांनी केलेल्या प्रवेशामुळे तळोदा शहर व तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होणार असून, नगरपालिकेवर शिंदे गटाचा प्रभाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मुंबई येथे रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पदाधिकाऱ्यांचे पक्षाचा गमछा देऊन स्वागत केले. संपर्कप्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी,आ. आमश्या पाडवी, जिल्हाप्रमुख ड. राम रघुवंशी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पदाधिकाऱ्यांनी शिंदे सेनेत प्रवेश केला. या प्रवेशामुळे तळोदा शहर व तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होणार असून, तळोदा नगरपालिकेवर शिंदे गटाचा प्रभाव वाढण्याची शक्यता आहे.ऊबाठा गट उपजिल्हाप्रमुख आनंद सोनार, तालुका प्रमुख प्रविण वळवी, माजी नगरसेविका प्रतीक्षा दुबे, माजी नगरसेविका कोमल सोनार, बाजार समितीच्या संचालिका रेखा माळी, युवा सेना तालुकाप्रमुख कल्पेश माळी,उपशहर प्रमुख जयेश सूर्यवंशी, विपुल कुलकर्णी, सोशल मीडिया समन्वयक विजय मराठे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख सुरज माळी, उपशहर प्रमुख देवेंद्र कलाल, अल्पसंख्यांक सेल तालुकाध्यक्ष इमरान शेख, युवा सेना उपशहरप्रमुख नितेश सोनार, तालुका संघटक विनोद वंजारी, उपशहर प्रमुख कल्पेश चव्हाण, तालुका उपप्रमुख काशिनाथ कोळी, युवा सेना तालुका उपप्रमुख मंगल वळवी, कांतीलाल पाडवी, युवा सेना उपशहरप्रमुख पवन भोई, तालुका उपसंघटक दारासिंग पाडवी तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटचे माजी नगरसेविका अनिता परदेशी, माजी सभापती सुनंदा पाडवी,युवक जिल्हाध्यक्ष संदिप परदेशी, बूथ बांधणी अभियान जिल्हाध्यक्ष केसरसिंग छोटुलाल क्षत्रिय, माजी बांधकाम सभापती हितेंद्र क्षत्रिय, जिल्हा उपाध्यक्ष विकासगिर गोसावी, जिल्हा सरचिटणीस गणेश पाडवी, युवक जिल्हा धर्मराज पवार, युवक जिल्हा उपाध्यक्ष शेख आदिल शेख दिलावर,जिल्हा उपाध्यक्ष योगेश पाडवी, अल्पसंख्याक सेल तालुका उपाध्यक्ष शहीद खान हमीद खान पठाण, कोषाध्यक्ष राहुल पाडवी,महिला अध्यक्ष शोभा क्षत्रिय आदींनी प्रवेश घेतला.

कर्मचाऱ्यांचा घंटानाद आंदोलन करण्याचा इशारा

धुळे, दि.७- जिल्हा परिषद अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. शासन पातळीवर या मागण्यांकडे हेतुतः दुर्लक्ष केले जात आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि.१० मार्च रोजी जि.प.कार्यालया समोर घंटानाद आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनने दिला आहे. जिल्हा परिषद अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या शासनस्तरावर केल्यानंतरही अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. दि.१० मार्च रोजी जि.प.कर्मचारी दिवसभर काळ्या फिती लावून कार्यालयात काम करणार आहेत. मधल्या सुटीत कार्यालयाबाहेर पडून घंटानाद आंदोलन करणार आहेत. असा इशारा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे दिनेश महाले, किशोर पगारे, दिपक महाले, अनिल बेडसे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्यांनी दिला आहे.

पान १ वरुन

विभागीय लोकशाही दिन

दिनाचेही आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेद्वारे सोडवणूक करण्यासाठी या दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वी ज्या समस्याग्रस्त व पीडित महिलांनी तालुकास्तर व जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिनात अर्ज केलेले असतील व त्यांच्या समस्येचे उत्तर मिळाले नसेल त्यांनी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे टोकन नंबरसह त्यांचे अर्ज दिनांक १० मार्च रोजी विभागीय महिला लोकशाही दिनात सकाळी ११ वाजता सादर करावेत, असे आवाहन विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास विभाग, नाशिक यांनी केले आहे.

यशवंत कान्हेरेंचे ग्रामस्थांकडून स्वागत

बाबांच्या विचाराने चालण्याचा निर्णय घेतला. त्यांचे बालपण व शिक्षण सोनगीर येथेच झाले असून येथे त्यांचे गांधी चौकात वडिलोपार्जित घर आहे. सध्या येथे त्यांच्या परिवारापैकी कोणीही राहत नसल्याने घर अनेक वर्षांपासून बंद आहे. सदर अभियाना अंतर्गत ते महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात मोटरसायकलने फिरणार आहेत. पुणे इथून सुरुवात करून ते खापोली, कोपरखैरन, नवी मुंबई, पालघर, जव्हार, त्रंबकेश्वर, नाशिक, सटाणा, साक्री, नंदुरबार, दोंडाईचा असा बारा दिवसांचा प्रवास करून ६ मार्च रोजी सोनगीर येथे दाखल झाले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य अविनाश महाजन, डॉ.शशिकांत आपटे, किशोर पावनकर, ज्ञानेश्वर चौधरी, अमित बागुल, किशोर पाटील, प्रमोद धनगर, अजय टेलर, वासुदेव पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. येथील आनंदवन शाळेच्या विद्यार्थ्यांना त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व समजून देत जनजागृती केली. नवीन पिढी घडवणे हा माझा उद्देश असल्याचे सांगत त्यांनी पुढील तीन महिन्यात चार हजार किलोमीटर प्रवास करण्याचा मानस व्यक्त केला आहे. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी १०४ दिवसांची पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण केली आहे. यावेळी ते ३७०० किलोमीटर पायी चालले. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत लोकांमध्ये स्वच्छते बद्दल जनजागृती करत असताना ज्या गावात आपले बालपण गेले त्या गावात येऊन लोकांना उद्देशीत करण्याचे भाग्य आपल्या वाटेला आले व गावकऱ्यांनी माझे मनापासून स्वागत केले त्याबद्दल त्यांनी गावकऱ्यांचे आभार मानले.

ट्रॉलावर दुचाकीची धडक

अवधानकडे येत असतांना रस्त्याच्या मधोमध उभा असलेला ट्रॉला क्र.एमएच १८/बीझेड-०२७० ला मागुन दुचाकीची धडक बसल्याने स्वप्नील डहाळेच्या डोक्याला व छातीला गंभीर दुखापत होवून त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रॉला चालक मोहम्मद रफीक इम्तियाज खान (वय ४३)रा. पजली पटी पोस्ट बयजा राम पूर जि.जोनपूर, उत्तर प्रदेश याच्या विरोधात मोहाडी नगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निधन वार्ता

शकुंतलाताई चौधरी

धुळे, दि.७- देवपूरमधील नकाणे रोडवरील आदर्श कॉलनीतील रहिवासी, शिवाजीराव उत्तमराव चौधरी यांच्या काकू, माजी महापौर प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांच्या सासू तसेच भगवान मांगो चौधरी (मुकटीकर) यांच्या धर्मपत्नी सौ.शकुंतलाताई भगवान चौधरी (वय ७९) वर्षे यांचे आज दि.७ रोजी दुपारी २.५१ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मनोहर पाटील

नंदुरबार, दि.७- मूळचे मोरवड ता.तळोदा आणि ह.मु. सोनाबाई नगर येथील रहिवासी मनोहर (मनीलाल) तुकाराम पाटील (वय ६२) यांचे ५ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ५ भाऊ, भावजयी, ३ मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. ते नंदुरबार मर्चन्ट बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी के.टी पाटील यांचे मोठे बंधू आणि नंदुरबार जिल्हा न्यायालयातील लिपिक शैलेश पटेल यांचे वडील होत.

सरपंच, ग्रामसेवकाचा जामीन अर्ज फेटाळला

(पान १ वरुन) योगेंद्रसिंग तवर यांनी गुन्ह्याचा तपास सुरू असतांना पाणीपट्टी आणि भुमिगत गटारीचे काम, नळ जोडणी, गुरांची हाळ यांची कामे झालेली नसतांनाही तसेच बनावट मुल्यांकन प्रमाणपत्रांच्या आधारे कंत्राटदाराला पैसे अदा करण्यात आल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले. याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने बारा लाख एकोणपन्नास हजार दोनशे शहाण्णव रूपयांचा अपहार केल्याचे मा.न्यायालयासमोर निदर्शनास आले. ग्रा.पं.बेटावद येथील २०२१-२२ या वर्षाचे लेखापरिक्षण झाले असून सदर लेखापरिक्षण मिलींद बन्सीलाल चौधरी यांनी ग्रामपंचायत बेटावद येथील लेखापरिक्षणाच्या वेळेस वरील कामांचे मुल्यांकन नसतांना मुल्यांकन लेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षण अहवालात दाखवण्यात आलेले आहेत म्हणून ते दोषी आढळून येत आहेत.

दोन्ही आरोपींच्या जामीन अर्जाचे कामकाजाची सुनावणी धुळ्यातील मे.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायमुर्ती श्री.डी.एम. आहेर साहेब यांच्या न्यायालयात करण्यात आली. यावेळी जिल्हा सरकारी वकील श्री.देवेंद्रसिंग योगेंद्रसिंग तवर यांनी सरकार पक्षातर्फे वरील नमुद बाबी मांडत प्रखर युक्तीवाद केला व आरोपींचा जामीन नामंजूर करण्याचा मा.न्यायालयास विनंती केली. सदरचा युक्तीवाद लक्षात घेता मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायमुर्ती श्री.डी.एम.आहेर यांनी आरोपींचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

फ्री! फ्री!! फ्री!!!
Buy 1 Get 1 Offer
हॉटेल आरंभ
व्हेज व नॉनव्हेज
महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
शनिवार व रविवारसाठी मर्यादित डिशेसवर विशेष ऑफर!!
हॉटेल आरंभ
महाराणा प्रताप चौक, स्वस्तिक टॉकीजजवळ, धुळे
(02562) 314626
9405577788

पाहिजे/भाड्याने देणे
महिंद्रा पिकअप माल वाहतूक गाडीसाठी अनुभवी ड्रायव्हर व ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. मध्यवर्ती ठिकाणी गोडावून भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9373929129

पाहिजेत
दुकानाच्या कामासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत.
MS-CIT/ TALLY झालेल्यांना प्राधान्य.
त्वरीत भेटा
-: संपर्क :-
श्री. दर्शन ट्रेडर्स
ग. नं. ४ मरिमाता मंदिराजवळ, धुळे

पाहिजेत
कापड दुकानासाठी
१) सेल्समन- १
२) सेल्सगर्ल- २
३) हेल्पर- १
समक्ष येऊन भेटा!
बेबीज वर्ल्ड
ग.नं.२, लालबाग मंदिरजवळ,धुळे
9850835999

पाहिजेत
कामासाठी मुले पाहिजेत.
संपर्क :- धुळे
9421526579

पाहिजेत
नवीन रेडिमेड कापड दुकानासाठी
१) सेल्समन - ०३ जागा
२) सेल्सगर्ल - ०२ जागा
(अनुभव असल्यास प्राधान्य) प्रत्यक्ष बायोडाटासहीत अर्ज करावा. त्वरित भेटावे. वेळ : सकाळी ११ ते १, संध्या.५ ते ७ लवकरात लवकर येणाऱ्यास प्राधान्य.
रॉयल मेन्स वेअर
१२३८. श्रीराम कॉम्प्लेक्स, ग.नं.४, बांबुगल्ली, धुळे
मो. 9423916107, 9021282225

पाहिजेत
होलसेल मेडीकल दुकानासाठी
१) सेल्समन- BSC पास असल्यास प्राधान्य- २
स्वत:ची गाडी आवश्यक
२) हेल्पर - ३
समक्ष भेटा!
श्री साई फार्मा
ग.नं.५, बँक ऑफ इंडिया समोर, धुळे

- पाहिजेत -
• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

कार्टून पुट्ठा
रु.१६.०० प्रति किलो बंडल
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

देणे आहे
चालू स्थितीतील बिअरबार, किचनसह हॉटेल देणे आहे.
-: संपर्क :-
9309114026

फ्लॅट भाड्याने देणे आहे
वेल फर्निश्ड सर्व सोईयुक्त 2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
दत्त मंदिर चौक जवळ, धुळे
-: संपर्क :-
7744045333

संगणक ऑपरेटर पाहिजे
MS ऑफिस/BCA/ civil किंवा Computer Diploma डाटा एंट्री व कार्यालयीन कामासाठी पूर्णवेळ अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
8625014012

पाहिजे
अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे.
-: संपर्क :-
9823833108
8788637592

पाहिजेत
सिलेंडर वाटप कामासाठी ॲपे रिक्षा चालवणारा हुशार, होतकरु डिलव्हरी बॉय पाहिजे.
तिरुपती गॅस एजन्सी
गल्ली नं.२, पुर्ती बिल्डींग समोर, धुळे
8554982900
7875556589

पाहिजेत
वेटर पार्ट टाईम व फुल टाईम पाहिजे. समक्ष भेटा!
हॉटेल शांती सागर
पारोळारोड, धुळे

Godrej
२५ वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.

आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट आणि वाढीव वॉरंटी...
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०